क्रमांक : २६४३/ ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ११ फेब्रुवारी, २०२६

# :: प रि प त्र क ::

**विषय : महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२६ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराकरिता नेमून देण्यात आलेल्या दिनांकांबाबतचे विवरणपत्र .....**

महाराष्ट्र विधानसभेचे सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणार आहे. **मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ ते बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६** या कालावधीतील तारांकित प्रश्नोत्तरांबाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र (मागील पृष्ठावर छापल्याप्रमाणे) आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

**ज्या विभागास प्रश्न चिन्हांकित केला आहे त्या विभागास असा प्रश्न अन्य विभागास हस्तांतरित करावयाचा असल्यास, विवरणपत्रात स्तंभ क्रमांक ५ मध्ये प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा दिनांक दर्शविण्यात आलेला आहे. उक्त दिनांकानंतर प्रश्न हस्तांतरणाची प्रकरणे या सचिवालयास प्राप्त झाल्यास तारांकित स्वीकृत प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक/गट बदलून देता येणे शक्य होणार नाही. अशा स्थितीत त्या प्रश्नाच्या उत्तरासाठी नेमून दिलेल्या दिनांकास उत्तर प्राप्त होणे आवश्यक राहील व संबंधित मा.मंत्री महोदयांना सदर तारांकित स्वीकृत प्रश्नांच्या उत्तराकरिता निश्चित केलेल्या मूळ दिवशीच सभागृहात उपस्थित राहून अनुपूरक प्रश्नांना उत्तरे द्यावी लागतील.**

**उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, तारांकित प्रश्न अन्य विभागाकडे हस्तांतरीत होत असल्यास, विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत सदर प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाची QIS या संगणक प्रणालीद्वारे कार्यवाही पूर्ण करावी व हस्तांतरणाबाबत विधानसभा प्रश्न कक्षाच्या b1.qust.mls@gmail.com या ई-मेलवर तातडीने पत्राद्वारे या सचिवालयास अवगत करण्याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांनी दक्षता घ्यावी.**

आपला
**( नागनाथ थिटे )**
सह सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

(१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(२) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(३) मा.मंत्री यांचे खाजगी सचिव
(४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित.

..२/-

**महाराष्ट्र विधानसभा**

**प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२६**

तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक, विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक तसेच प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा दिनांक इत्यादीबाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक (४) | प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा दिनांक (५) |
|---|---|---|---|---|
| एक | (१) वैद्यकीय शिक्षण मंत्री<br>(२) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(३) मृद व जलसंधारण मंत्री<br>(४) उद्योग, मराठी भाषा मंत्री<br>(५) महिला व बालविकास मंत्री<br>(६) ग्रामविकास व पंचायत राज मंत्री<br>(७) कामगार मंत्री<br>(८) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | सोमवार, दिनांक ०२ मार्च, २०२६<br>सोमवार, दिनांक ०९ मार्च, २०२६<br>सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६<br>सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ | मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६<br>सोमवार, दिनांक ०२ मार्च, २०२६<br>मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६<br>सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६ | शुक्रवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०२६<br>शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६<br>शुक्रवार, दिनांक ०६ मार्च, २०२६<br>शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६ |
| दोन | (१) मुख्यमंत्री<br>(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री<br>(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री<br>(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री<br>(५) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री<br>(६) परिवहन मंत्री | मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६<br>मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६<br>मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६<br>मंगळवार, दिनांक २४ मार्च, २०२६ | मंगळवार, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६<br>बुधवार, दिनांक ०४ मार्च, २०२६<br>बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६<br>मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६ | शुक्रवार, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२६<br>शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६<br>शुक्रवार, दिनांक ०६ मार्च, २०२६<br>शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६ |
| तीन | (१) महसूल मंत्री<br>(२) वने मंत्री<br>(३) आदिवासी विकास मंत्री<br>(४) कृषी मंत्री<br>(५) सामाजिक न्याय मंत्री<br>(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री<br>(७) मदत व पुनर्वसन मंत्री<br>(८) मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री | बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६<br>बुधवार, दिनांक ०४ मार्च, २०२६<br>बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६<br>बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६<br>बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६ | बुधवार, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२६<br>बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६<br>गुरुवार, दिनांक ०५ मार्च, २०२६<br>गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६<br>बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ | शुक्रवार, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२६<br>शुक्रवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०२६<br>शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६<br>शुक्रवार, दिनांक ०६ मार्च, २०२६<br>शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६ |
| चार | (१) * मुख्यमंत्री (वित्त विभाग व नियोजन (रोजगार हमी योजना विषयक बाबी वगळून) विभाग)<br>(२) ** उप मुख्यमंत्री<br>(३) अन्न, नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण मंत्री<br>(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(५) अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री | गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६<br>गुरुवार, दिनांक ०५ मार्च, २०२६<br>गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६ | शुक्रवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०२६<br>गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६<br>शुक्रवार, दिनांक ०६ मार्च, २०२६ | शुक्रवार, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२६<br>शुक्रवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०२६<br>शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ |

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक (४) | प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा दिनांक (५) |
|---|---|---|---|---|
| पाच | (१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री<br>(२) उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री<br>(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री<br>(४) शालेय शिक्षण मंत्री<br>(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री<br>(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री<br>(७) वस्त्रोद्योग मंत्री<br>(८) सहकार मंत्री | शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६<br>शुक्रवार, दिनांक ०६ मार्च, २०२६<br>शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६<br>शुक्रवार, दिनांक २० मार्च, २०२६ | सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६<br>शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६<br>सोमवार, दिनांक ०९ मार्च, २०२६<br>शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६ | शुक्रवार, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२६<br>शुक्रवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०२६<br>शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६<br>शुक्रवार, दिनांक ०६ मार्च, २०२६ |

* **वित्त विभाग व नियोजन (रोजगार हमी योजना विषयक बाबी वगळून) विभाग मा.मुख्यमंत्री यांचेकडे असले तरी सदर विभाग तत्कालीन उपमुख्यमंत्री यांच्या गटामध्ये म्हणजे गट-४ मध्ये अंतर्भूत आहेत.**

** **सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या अधिसूचनेन्वये राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ हे विभाग श्रीमती सुनेत्रा अजित पवार, उपमुख्यमंत्री यांच्याकडे सोपविण्यात आले आहेत. सदर विभाग गट-४ मध्ये अंतर्भूत आहेत.**

*****